# राशिभविष्य - डिसेंबर, २०१६ .

दादा दामले(dadadamle@gmail.com)

==========================================================

**(१) मेष -** या राशीच्या मंडळीना या महिन्याचा संपूर्ण काळ अनुकुल नसल्याने त्यांनी सतत आपल्या संतापी व अविचारी आचरणावर नियंत्रण ठेवावे, सर्वच ठिकाणी संयम आणि सहनशीलतेने आचरण करावे, तोंडाला कुलूप घालून भावविचार वा मते मुळीच व्यक्त करू नयेत, असे आग्रहाने सांगावेसे वाटते. असे आचरण करून प्रतिकुल काळ व्यतीत करणेच सुखाचे होईल. या राशीच्या काही मंडळीना हातचे सोडून नवीन काही करण्याची उर्मी येईल, पण त्यांनी तो विचार मनातून काढून टाकावा. नपेक्षा काय घडेल ते सांगण्याची आवश्यकता नाही. नोकरी-व्यवसाय कोणताही असो, सतत अपेक्षाभंग, मनस्ताप देणाऱ्या घटना घडणे संभवते. त्यामुळे शारीरिक, मानसिक अनारोग्य होणेही शक्य आहे. केवळ या राशीच्या पंचम स्थानी असलेला राहू दलाली-कमिशनवर व्यवसाय करत असणारांना अनुकुल व लाभदायक होईल. या राशीच्या गर्भवती स्त्रियांनी अकारण दगदग करू नये. या राहूमुळे विविध कारणानी संततिसुखात बाधा येणे संभवते. जपा. महिन्याच्या पूर्वार्धात गुरु-मंगळ शुभ योग असल्याने बौद्धिक, शैक्षणिक कार्यक्षेत्र, यांत्रिक तांत्रिक कार्यक्षेत्र, कलात्मक व्यवसाय असणारांना महिन्याचा केवळ पूर्वार्धच काही प्रमाणात अनुकुल, प्रगतिकारक व लाभदायक होणे संभवते. हर्षलमुळे धक्कादायक प्रसंग निर्माण होणे शक्य आहे. जपा. महिन्याच्या उत्तरार्धात मंगळ ग्रह या राशीच्या लाभस्थानी गेल्यावर काही मंडळीना मौल्यवान गोष्टींचा लाभ होणे संभवते. अस्वस्थ मनस्थितीमुळे या राशीच्या विद्यार्थ्यांचे अभ्यासाकडे दुर्लक्ष होणे संभवते. जपा. श्रद्धेने श्रीगणेश उपासना करा.

**(२) वृषभ -** या राशीच्या मंडळीना या महिन्याच्या काळात स्वत:च्या व कुटुंबियांच्या आरोग्यविषयक समस्याना सामोरे जावे लागेलसे दिसते. तसेच राहूमुळे कौटुंबिक सुखात व गृहसौख्यात बाधा येणे संभवते. जपा. या राशीच्या नोकरदार मंडळीना या महिन्याचा संपूर्ण काळ अनुकुल नाही, असेच म्हणावे लागेल. त्यामुळे काहीना आहे ती नोकरी सोडून नवीन काही करण्याची उर्मी येईल. पण त्यांनी मनावर ताबा ठेवून व सहनशील बनून आहे त्या नोकरी - व्यवसायातच काळ व्यतीत करावा. तेच सुखाचे होईल. व्यापार-व्यवसायात अस्थिर स्थिती निर्माण होणे संभवते. पण मानसिक आजार तज्ज्ञ व द्रव पदार्थांचे व्यापारी यांना संपूर्ण महिन्याचा काळ अनुकुल, प्रगतिकारक व लाभदायक होईल. तसेच उच्च बौद्धिक व शास्त्रीय संशोधन कार्यक्षेत्र असणाराना काळ अनुकुल, प्रगतिकारक व यशदायक होईल.

महिन्याच्या पूर्वार्धात भाग्य स्थानी असलेल्या शुक्रामुळे काहीना गुरुकृपा तर काहीना थोरकृपा प्राप्त होईल. तसेच काहीना कीर्ती-प्रसिद्धी प्राप्त होणेही शक्य दिसते. पण महिन्याच्या उत्तरार्धात कलात्मक नोकरी-व्यवसाय असणारांच्या मार्गात अडचणी, अडथळे निर्माण होणे संभावते. शक्यतो प्रवास करू नका. प्रवासात मनस्ताप सहन करावा लागण्याची शक्यता आहे. जपा. या राशीच्या पंचम स्थानी असलेल्या कन्यागत गुरु ग्रहामुळे या राशीच्या विद्यार्थ्यांना अपेक्षित शैक्षणिक प्रगती करणे शक्य होईल. तसेच युवक-युवतींचे प्रेमसंबंध जुळून येणे संभवते. जुने प्रेमसंबंध असतील तर ते दृढ होतील. श्रद्धा असेल तर शिवोपासना व हनुमान उपासना अनुकुल होईल. हनुमानचालिसा स्तोत्राचे पठण करा.

**(३) मिथुन -** या राशीच्या मंडळीना या महिन्याचा पूर्वार्ध खूपच अनुकुल असल्याचा अनुभव येईल. प्रचंड उत्साही मन, प्रगल्भ विचार, कर्तृत्व सिद्ध करणारी कृती, नोकरी-व्यवसायात अनुकुल परिस्थिती, हितशत्रूंवर मात, वरिष्ठांकडून प्रशंसाअशा अनेक घटना घडतील. म्हणून जे काय साधावयाचे ते महिन्याच्या पूर्वार्धातच साधून घेण्याचा आटोकाट प्रयत्न करा. कन्यागत गुरु या राशीच्या चतुर्थ स्थानी असल्यामुळे कौटुंबिक सुख व गृहसौख्य लाभेल; काहींचे स्थावर खरेदी विक्रीचे व्यवहार होतील, पण काहीही कारणाने नातेवाईक मंडळीकडून त्रास होणे संभवते. जपा. वकिली-सल्लागारी व्यवसाय, शास्त्रीय संशोधन कार्यक्षेत्र, अन्य चिकित्सक बौद्धिक क्षेत्र असणारांना व लोखंड, कोळसा व्यापार असणारांना तसेच यांत्रिक तांत्रिक व्यवसाय असणारांना काळ अनुकुल, प्रगतिकारक व लाभदायक होईल. महिन्याच्या उत्तरार्धात विविध कारणानी मनस्ताप देणाऱ्या घटना घडण्याची शक्यता दिसते. जपा. जीवनसाथीच्या अनारोग्याची समस्या, संततिसमस्या, तसेच स्वत:चे अनारोग्य त्रस्त करील. जपा. काहीना पोटविकार, काहीना मूत्राशयविकार अशापैकी आजार त्रस्त करतील. जपा. शारीरिक-मानसिक कष्ट व असह्य मनस्ताप यांमुळे शारीरिक उष्णता भडकून उष्णताविकार बळावतील. काहीना मूळव्याधीचा त्रास होणेही संभवते. जपा. विचाराच्या तंद्रीत वा मोबाईलवर बोलत वाहन चालवू नका. अपघात भय आहे. जपा. आध्यात्मिक उपासनेस काळ अनुकुल आहे. प्रिय दैवताची उपासना करा. सूचक स्वप्ने पडतील, काहीना परदेशगमनाची संधी मिळेल, गुरु-शुक्राच्या शुभ योगामुळे मधून मधून मनोनुकुल घटना घडतील व दिलासा मिळेल.

**(४) कर्क -** या राशीच्या मंडळीना या महिन्याचा काळ फारसा अनुकुल नाही, असेच म्हणावे लागेल. केवळ महिन्याच्या उत्तरार्धात नोकरी-व्यवसायात काही अनुकुल व लाभदायक घटना

घडण्याची शक्यता दिसते. या राशीच्या लेखक-लेखिकांना त्यांचे लेखन साहित्य रूपाने प्रकाशित होण्यास काळ अनुकुल होईल. प्रवासाचेयोग येतील. पण एखादी भावंडविषयक समस्या त्रस्त कारीलसे दिसते. धनस्थानी असलेल्या राहूमुळे कौटुंबिक जीवनात विविध कारणांनी वाद, भांडणे होणे संभवते. तसेच जीवनसाथीला अपार कष्ट व मनस्ताप सहन करावा लागण्याची शक्यता दिसते. जपा. त्याशिवाय काही मंडळीना आर्थिक समस्याही त्रस्त करण्याची शक्यता आहे. जपा. विशेष करून महिन्याच्या पूर्वार्धात रवि - शनि प्रतिकुल असल्याने मुलांपैकी कोणाचे अनारोग्य, तर कोणाची अन्य समस्या त्रस्त करील. प्रिय जनांपासून दूरत्व निर्माण होणे संभवते. नोकरीत वरिष्ठांचा त्रास सहन करावा लागेल. त्यामुळे गहरे नैराश्य येणेही संभवते. जपा. अपघात भय असल्याने सतत सावधानतेने आचरण करा. महिन्याचा उत्तरार्ध या राशीच्या नोकरदार मंडळीना तसेच शास्त्रीय संशोधन कार्यात कार्यरत असणाराना अनुकुल व लाभदायक होईल. काहीना दूरच्या प्रवासाचे तर काहीना परदेशगमनाचे योग येतील. पण मंगळ ग्रह पूर्णपणे प्रतिकुल असल्याने भागीदारीत व्यापार-व्यवसाय असणारांना मनस्ताप देणारा असा सिद्ध होईल. जपा. वैवाहिक जीवनात स्वत:च्या किंवा जीवनसाथीच्या अनारोग्यामुळे व अन्य कारणानी अपेक्षित वैवाहिक जीवनातील सुख मिळण्याची शक्यता दिसत नाही. जलभय, विषभय आहे. जपा.

श्रीगुरुदेव दत्तात्रेयाची उपासना करा. “बावन्न श्लोकी गुरुचरित्रा“चे पठण करा.

**(५) सिंह -** या राशीच्या मंडळीना या महिन्याचा संपूर्ण काळ प्रतिकुल आहे, असेच म्हणावे लागेल. त्यामुळे घरीदारी सर्व ठिकाणी या राशीच्या मंडळीनी सतत आपल्या मानी, संतापी स्वभावावर नियंत्रण ठेवून, मनावर व विचारशक्तीवर ताबा ठेवून आणि सहनशील बनून आचरण करणेच सुखाचे होईल. रक्तविकार, हृदयविकार असणारांनी तर सतत मन शांत व स्वस्थ ठेवूनच राहावे, हे उत्तम. नपेक्षा शारीरिक उष्णता भडकून उष्णताविकारांचा त्रास सहन करावा लागेल. जपा. कौटुंबिक जीवनातही वाद, भांडणे, गैरसमज, संततिसमस्या, प्रिय जनांपैकी कोणाचे दूरत्व अशापैकी कारणानी मन सतत अस्वस्थ राहण्याची शक्यता दिसते. सतत सावधानतेने आचरण करा. अपघात भय संभवते. नोकरी-व्यवसायातही प्रतिकुल घटना घडतील. जपा. चोरी, फसवणूक अशापैकी कारणांनी काही जणाना आर्थिक चिंता त्रस्त करतील. कुसंगतीपासून दूर राहणेच सुखाचे होईल. गुरु ग्रहाच्या अनुकुलतेमुळे मधून मधून मनोनुकुल घटना घडतील व दिलासा मिळेल. जीवनसाथीचे विक्षिप्त आचरण, दोघांतील वाद, भांडणे अशापैकी कारणानी वैवाहिक जीवनातील सुखातही बाधा येणे संभवते. जपा. भागीदारीत व्यापार-व्यवसाय

असणारांनी महिन्याच्या उत्तरार्धात काहीही कारणाने भागीदारीत बाधा येणार नाही, याची काळजी घ्यावी. वैद्यकीय व्यवसाय, औषधविक्रेते, यांत्रिकतांत्रिक नोकरीव्यवसाय असणाराना तसेच कलात्मक व्यवसाय असणारांना गुरु-शुक्राच्या शुभ योगामुळे काळ अनुकुल, प्रगतिकारक व लाभदायक होईल. आरोग्य उत्तम राहिल्यास या राशीच्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक प्रगतीस काळ अनुकुल होईल.

**(६) कन्या -** तुलनात्मक दृष्ट्या या राशीच्या मंडळीना महिन्याचा पूर्वार्धच अनुकुल व लाभदायक होईल, असे वाटते. सर्व प्रकारचे आरोग्य उत्तम राहील व नोकरी-व्यवसायात मनोनुकुल घटना घडतील. या राशीच्या युवकांना नवी उत्तम नोकरी किंवा आवडते नवे कार्यक्षेत्र मिळणे संभवते. चिकित्सक बौद्धिक नोकरी-व्यवसाय, वकिली, सल्लागारी व्यवसाय, वैद्यकीय व्यवसाय, शास्त्रीय संशोधन , साहित्यिक लेखन व्यवसाय असणारांना तसेच यांत्रिक तांत्रिक नोकरी-व्यवसाय, औषध विक्रेते अशांना महिन्याचा पूर्वार्धच अनुकुल होणार असल्याने जे काय साधावयाचे ते त्यांनी महिन्याच्या पूर्वार्धातच साधून घेण्याचा आटोकाट प्रयत्न करावा. गुरु-शुक्राच्या शुभ योगामुळे पूर्वार्धात कौटुंबिक सुख व गृहसौख्य लाभेल; पण संततीसुखात थोडी बाधा येणे संभवते. तसेच भावंडविषयक एखादी चिंता त्रस्त करील. जपा. महिन्याच्या उत्तरार्धात उष्णताविकारांचा त्रास होणे संभवते. काहीना ताप येणे, तर काहीना फोड येणे, इजा होणे असे आजार होण्याची शक्यता दिसते. काहीना अपप्रचाराचा त्रास सहन करावा लागेल. जपा. तसेच चोरीमुळे व पैसे गहाळ होण्यामुळे आर्थिक नुकसान होणे संभवते. जपा. काही मंडळीना उगीचच एखादी आजार भावना किंवा काल्पनिक चिंता त्रस्त करील. जीवनसाथीचे लहरी, विक्षिप्त वागणे, दोघांतील वाद, मतभेद यांमुळे वैवाहिक जीवनात अपेक्षित सुख मिळणे कठीण दिसते. जपा. भागीदारीत व्यापार-व्यवसाय असणारांनी गैरसमजाने वा अन्य कारणाने भागीदारीत बाधा येणार नाही याची काळजी घ्यावी. मन:शक्तीसाठी हनुमानचालिसा स्तोत्राचे दररोज पठण करा.

**(७) तुळा -** या राशीच्या मंडळीना या महिन्याचा पूर्वार्ध आरोग्य, कौटुंबिक सुख या दृष्टीने प्रतिकुल असून आर्थिक समस्याही त्रस्त करण्याची शक्यता जाणवते. घरात असमाधानकारक घटना घडणे संभवते. काहीना राहत्या जागेची समस्या तर काहीना स्थावर संबंधी समस्या त्रस्त करण्याची शक्यता दिसते. काहीना पोटविकाराचा त्रास सहन करावा लागेल. पण गुरु-शुक्रामुळे परिस्थिती आटोक्यात राहील. शेती व्यवसाय असणाराना संपूर्ण महिन्याचा काळ अनुकुल व लाभदायक होईल. महिन्याचा उत्तरार्ध या राशीच्या सर्व नोकरदार मंडळीना तसेच यांत्रिकतांत्रिक नोकरी-व्यवसाय असणाराना, औषधविक्रेत्यांना, शास्त्रीय व गूढ संशोधनकार्यात मग्न असणाराना अनुकुल व प्रगतिकारक होईल. अध्यात्मात

रस असणारांना उपासनेद्वारे मन:शांती मिळू शकेल. सामाजिक कार्यात रस असणाराना काळ अनुकुल होईल. नोकरीत काहीना बढती, अधिकारपद असे काही मिळणे संभवते. पण नोकरीत वाममार्ग धन सहज मिळणे शक्य असले तरी तो मोह कटाक्षाने टाळाच. तसेच जुगाराच्या नाडी लागू नका. नुकसानच होईल. विविध कारणानी संततिसुखात बाधा येणे संभवते. जपा. तसेच या राशीच्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीतही विविध कारणांनी अडथळे येणे संभवते. जपा. चिकित्सक बौद्धिक कार्यक्षेत्र असणारांनी अति विचार करू नये. काहीना डोकेदुखीचा, मुदतीच्या तापाचा तर काहीना मेंदू विकाराचा आजार होणे संभवते. जपा. शनि ग्रहाच्या साडेसातीचा अखेरचा काळ आहे. मनावर संयम ठेवून व सहनशील बनून आचरण करा. सर्व सुखाचेच होईल. हनुमान चालीसा स्तोत्राचे दररोज पठण करा.

**(८) वृश्चिक -** या राशीच्या मंडळीनी या महिन्याच्या काळात मन व विचारशक्तीवर ताबा ठेवून तसेच जिभेला लगाम घालून आचरण करणेच सुखाचे होईल. कारण नियोजित कार्यात अडथळे येणे, मनस्ताप देणाऱ्या घटना घडणे, स्वत:च्या वा जीवनसाथीच्या अनारोग्याची समस्या त्रस्त करणे, प्रिय जनांपैकी कोणाचे दूरत्व होणे अशापैकी घटना घडणे संभवते. जपा. महिन्याच्या उत्तरार्धात मंगळ या राशीच्या चतुर्थ स्थानी गेल्यावर तर काहीना राहत्या जागेची समस्या तर काहीना स्थावरसंबंधी समस्या त्रस्त करील. अशा प्रतिकुल काळात रक्तविकार, हृदयविकार असणारांनी तर विशेषच जपले पाहिजे. काळ प्रतिकुल असला तरी शुक्र ग्रहाच्या अनुकुलतेने काही मनोनुकुल घटना घडतील व मानसिक ताण थोडा कमी होईल. लाभस्थानी असलेल्या गुरु ग्रहामुळे सर्व प्रकारच्या नोकरदार मंडळीना, कलात्मक नोकरी-व्यवसाय असणारांना, गूढ व शास्त्रीय संशोधन कार्यक्षेत्र असणारांना संपूर्ण महिन्याचा काळ अनुकुल व लाभदायक होईल. या राशीच्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक प्रगती करणे शक्य होईल. विवाहेच्छूचे विवाह ठरतील वा संपन्न होतील. नवे मित्र मिळतील. महिन्याच्या उत्तरार्धात दांपत्यजीवनातील सुखात विविध कारणांनी बाधा येणे संभवते. शनि ग्रहाच्या साडेसातीचा काळ आणि याच राशीत शनि ग्रह असल्यामुळे जानेवारी, २०१७ पर्यंतचा काळ अकारण दगदग व मनस्ताप न करता शांत मनाने व्यतीत करणेच सुखाचे होईल. श्रद्धा असेल तर श्रीगणेश उपासना आणि श्रीहनुमान उपासना अनुकुल होईल. दररोज नियमितपणे हनुमानचालिसा स्तोत्राचे पठण करा.

**(९) धनु -** या राशीच्या मंडळीना या महिन्याचा संपूर्ण काळ फारसा अनुकुल नाही, असेच म्हणावे लागेल. शनी ग्रहाच्या साडेसातीचा काळ असून सध्या शनि-रवि पूर्णपणे प्रतिकूल

असून काही प्रमाणात मंगळ - राहू व हर्षल हे ग्रह असह्य मनस्ताप देतील. जपा. केवळ बौद्धिक व शास्त्रीय संशोधन कार्यक्षेत्र असणारांना काळ अनुकुल व यशदायक होणे संभवते. काही मंडळीना मनापासून आवडणारे असे नवे बौद्धिक वा शास्त्रीय संशोधनात्मक कार्यक्षेत्र मिळू शकेल. राहू-हर्षल कुयोगामुळे कोणाशी पटणार नाही, सतत तक्रारी, भांडणे करत राहाल, समोर ठाकलेल्या परिस्थितीत कौटुंबिक सुखसमाधान लाभणार नाही, सतत मनाविरुद्ध घटना घडतील. त्यामुळे शारीरिक मानसिक अनारोग्य होणे संभवते. जपा. या काळात सर्व आर्थिक व्यवहार डोळ्यात तेल घालून, सावधानतेने करा. नपेक्षा आर्थिक नुकसानीसह मानहानी होणे संभवते. मधून मधून मनोनुकुल घटना घडतील. काहींना कोर्ट प्रकरणांचा त्रास सहन करावा लागेलसे दिसते. शिवाय अनारोग्य होईल व उष्णता विकार बळावतील. काहीना घसा, दाढा, मानदुखीचा तर काहीना नेत्रदुखीचा आजार होणे संभवते. जपा. केतुमुळे या राशीच्या व्यापारी मंडळीना स्त्रीग्राहकांकडूनच अधिक अर्थलाभ होईल. अशा प्रतिकुल काळातही गुरु-शुक्राच्या अनुकुलतेमुळे मनोनुकुल घटना घडतील व दिलासा मिळेल. अध्यात्माची आवड असणारांना उपासनेद्वारे मन:शांती मिळू शकेल. काहीना जलप्रवासाचे तर काहीना परदेशगमनाचे योग येतील. श्रद्धेने श्रीगुरुदेव दत्तात्रेयाची उपासना करा. “बावन्न श्लोकी गुरुचरित्रा“ चे दररोज नियमितपणे पठण करा.

**(१०) मकर -** जिद्दी स्वभाव, मानापमान फार असल्यामुळे या राशीच्या मंडळीना या महिन्याच्या काळात अकारण शारीरिक पीडा, श्रम, दगदग होणे संभवते. शिवाय आर्थिक समस्या त्रस्त करण्याची शक्यता असल्यामुळे शारीरिक-मानसिक अनारोग्य होणे शक्य दिसते. शारीरिक उष्णता भडकून उष्णताविकारांचे आजार त्रस्त करतील. काही मंडळीना घसा, दाढा, मान दुखणे, तर काहीना डोळ्याचे आजार त्रस्त करतीलसे दिसते. जपा. या राशीच्या नोकरदार मंडळीना महिन्याचा पूर्वार्धच अनुकुल व लाभदायक होईल. म्हणून त्यांनी जे काय साधावयाचे ते महिन्याच्या पूर्वार्धातच साधून घेण्याचा प्रयत्न करावा. महिन्याचा उत्तरार्ध नैराश्य आणणारा, मनस्ताप देणारा असाच असण्याची शक्यता आहे. जपा. उच्च बौद्धिक व शास्त्रीय संशोधन कार्यक्षेत्र, वकिली, सल्लागारी व्यवसाय, लोखंड-पोलाद-कोळसा व्यापारी यांना संपूर्ण महिन्याचा काळ अनुकुल व लाभदायक होईल. काही भाग्यवंताना परदेशगमनाची संधी मिळणेही संभवते. पण वाममार्ग धन सहज मिळणे शक्य असले तरी तो मोह टाळाच. या राशीच्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीत विविध कारणांनी बाधा येणे संभवते. तसेच या राशीच्या मंडळीच्या संततिसुखातही विविध कारणानी बाधा येणे संभवते. पण गुरु-शुक्राच्या अनुकुलतेने परिस्थिती आटोक्यात राहील, वैवाहिक जीवनातील सुख व कौटुंबिक सुख लाभेल व मधून मधून

मनोनुकुल घटना घडतील. दिलासा मिळेल. अध्यात्मात रस असणारांना उपासनेद्‌वारे मन:शांती मिळू शकेल. श्रद्धेने श्रीहनुमान उपासना करा. दररोज नियमितपणे हनुमानचालिसा स्तोत्राचे पठण करा.

**(११) कुंभ** - सध्या या राशीच्या मंडळीची मनस्थिती अत्यंत कोमल झाली असल्यास मानसिक संवेदनाही शीघ्र अशा होत असतील. त्यामुळे मनासारखे थोडे जरी काही झाले नाही तरी लगेच नैराश्य येत असेल, असे वाटते. तसेच विचारशक्तीही अस्थिर, चंचल झाली असल्यास अविचाराचे विचित्र आचरण होत असण्याची शक्यता जाणवते. अशा परिस्थितीत जिभेला लगाम घालून व मनावर संयम ठेवून आचरण करणेच सुखाचे होईल. नपेक्षा आपल्या अविचारी फटकळ बोलण्याने समोरच्याचे मन दुखावले जाईल व त्यामुळे संबंध बिघडतील. जपा. मंगळ ग्रह पूर्णपणे प्रतिकुल असल्याने सतत मानहानीच्या घटना घडतील. काही मंडळीना जुन्या दबलेल्या प्रकरणांचा पुन्हा नव्याने मनस्ताप होणे संभवते. गैरसमजुतीने वाद, भांडणे होणे संभवते. जपा. या राशीच्या सर्व नोकरदार मंडळीना तसेच चिकित्सक बौद्धिक व्यवसाय असणारांना, लोखंड, पोलाद, कोळसा व्यापार असणारांना काळ अनुकुल व लाभदायक होईल. ज्यांच्या जन्मकुंडलीत अचानक धनलाभाचे योग असतील त्यापैकी काहीना असा धनलाभ किंवा वारसा हक्काने धन मिळणे संभवते. वाममार्ग धन मिळणे शक्य असले तरी तो मोह टाळा. होत्याचे नव्हते होणे संभवते. जपा. दाम्पत्य जीवनात जीवनसाथीचे अनारोग्य, दोघातील वाद , भांडणे अशापैकी कारणानी वैवाहिक सुखात बाधा येणे शक्य दिसते. जपा. अशा परिस्थितीतही शुभ ग्रहांच्या काही प्रमाणातील अनुकुलतेमुळे मधून मधून मनोनुकुल घटना घडतील व दिलासा मिळेल. श्रद्धा असेल तर शिवोपासना अनुकुल होईल. तसेच दररोज नियमाने हनुमानचालिसा स्तोत्राचे पठण करा.

**(१२) मीन** - सध्या या राशीच्या मंडळीचा स्वभाव अस्थिर, लहरी, चंचल असा झाला असावा, असे वाटते. त्यामुळे कोणी समजूत काढण्यासाठी काही चार गोष्टी सांगण्याचा प्रयत्न केला तरी ते सहन होत नसावे; व नकळत समोरच्याचा अपमान होत असावा, असे वाटते. खरोखरच असे काही घडत असेल तर आवर्जून सांगावेसे वाटते की मन व बुद्धीवर ताबा ठेवून व सहनशील बनून आचरण करणेच सुखाचे होईल. नपेक्षा अकारण प्रिय जन दुखावले जातील आणि संबंध तुटतील. जपा. या राशीच्या नोकरदार मंडळीना महिन्याचा उत्तरार्धच अनुकुल व लाभदायक होईल. पर धर्मीयांशी व्यावसायिक संबंध असणाराना तर अशा संबंधामुळे व्यवसायात लाभ होणे व प्रगती करणे शक्य होईल. गुप्त पोलीसखात्यात

कार्यरत असणारांना संपूर्ण महिना अनुकुल व यशदायक होईल. यांत्रिक तांत्रिक नोकरी-व्यवसाय, वैद्यकीय व्यवसाय, औषध विक्रेते, अशांना मात्र महिन्याचा प्रथम सप्ताहच लाभदायक होईल. इतरांना कष्ट परिश्रम करूनच अपेक्षित अर्थप्राप्ती होण्यास प्रयत्न करावा लागेल. काहीही कारणाने मित्रांशी वितुष्ट येणे संभवते. जपा. काही मंडळीना दूरच्या प्रवासाची संधी प्राप्त होईल; तर काही भाग्यवान मंडळीना मौल्यवान वस्तूंचा लाभ होणेही शक्य आहे. आरोग्य उत्तम राखू शकले तर या राशीच्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक प्रगती करणे सहज शक्य होईल. गुरु-शुक्र या शुभ ग्रहांच्या अनुकुलतेने कौटुंबिक सुख, संततिसुख व गृहसौख्य लाभेल. मनोनुकुल घटना घडतील व दिलासा मिळेल. आपली राशी गुरु ग्रहाची अनुकुल राशी असल्याने श्रीगुरुदेव दत्तात्रेयाची उपासना करा. बावन्न श्लोकी गुरुचरित्राचे पठण करा.

=====ooooo0ooooo=====